एकमेव विचारपत्र
महाराष्ट्र न्यूज

# सेंद्रीय शेतीची प्रभावी अंमलबजावणी

सेंद्रीय उत्पादन करीत असतांना खालील पंचसुत्रीचा अवलंब करणे गरजेचे आहे.

१. **जमिनीचे आरोग्य व्यवस्थापन** : जमिनीचे सेंद्रीय कर्ब वाढवुन मुख्य व सुक्ष्म अन्नद्रव्य मुबलक प्रमाणात पिकांना उपलब्ध करणे पिक फेरपालट अशा पध्दतीने करणे जेणे करुन जमीनीतील उपलब्ध अन्नद्रव्ये योग्य प्रमाणात पिकांना मिळत राहतील जमिनीचे सेंद्रीय कर्ब वाढवुन मुख्य व सुक्ष्म अन्नद्रव्य मुबलक प्रमाणात पिकांना उपलब्ध करणे,

२. **स्वावलंबन** : पूर्वी आपल्या देशात प्रत्येक शेतकरी स्वतला लागणारे खत स्वतच निर्माण करत होता. ती पद्धत आता उपयोगात आणण्याची गरज आहे. स्वत: लागणाऱ्या बियाण्याचे उत्पादन, शेणखत, गांडुळखत, वनस्पतींचा अर्क इ. स्वत: उत्पादन करणे, पर्यावरणाचा समतोल राखुन, जैविक परिसंस्था सांभाळणे निविष्ठांची निर्मीती जास्तीत जास्त आपण स्वत: तयार करणे. सेंद्रीय खतांच्या उपलब्धतेसाठी पशुपालन करणे. वरील मुद्दे लक्षात घेतल्यावर आपल्याला असे लक्षात येते की, सध्याच्या स्थितीत शेतकरी भाजीपाला पिकांचे उत्पादन वर्षभर घेत असतात, पण हिरवळीच्या पिकांचे बी पेरण फुलोरा अवस्थेत गाडण्याची क्रिया जवळजवळ संपुष्टात आली आहे. दुसरी गोष्ट जमिनीच्या सततच्या विभाजनामुळे जमिन धारणा क्षमता कमी झाली आहे. यामुळे बांधावर हिरवळीच्या खतांचे झाडांची लागवड शक्यतो कोणीच करत नाही. शेतमजुरांची भिषण टंचाई लक्षात घेता जनावरांची संख्या कमी झालेली दिसते. त्यामुळे शेणखताची उपलब्धता कमी झाल्याचे दिसुन येते. हिरवळीच्या खतांची झाडे सामुहिकरित्या लागवड करणे गरजेचे आहे. यंत्राचा वापर करुन मजुर टंचाईवर मात करु शकतो. किड व रोग व्यवस्थापन करण्यासाठी दशपर्णी अर्कांचा वापर करीत असतांना प्रत्येक वनस्पतीचा गुणधर्म बारकाईने तपासणे गरजेचे आहे. जेणेकरुन विशिष्ट वनस्पतीच्या अर्कामुळे कोणत्या किड व रोगाचे व्यवस्थापन होते हे आपल्यास लक्षात येईल. एकात्मिक शेती पध्दतीचा जसे की मधुमक्षिका पालन हा जोड व्यवसाय पिक उत्पादन वाढीसाठी उपयुक्त ठरतो. त्यासोबतच सेंद्रीय मध विक्रीपासुन फायदा होतो.

३. **यांत्रिकीकरण** : सेंद्रीय शेतीमध्ये तणनाशक न मारता तणांचे नियंत्रण करणे आवश्यक आहे. पण खुरपणी इ. साठी मजुरांची उपलब्धता हा गंभीर प्रश्न आहे. या वरील अडचणी लक्षात घेतल्या आपल्याला मार्ग निर्माण करणे गरजेचे आहे. यांत्रिकीकरण मोठ्या शेतकऱ्यांना करणे सोपे आहे पण लहान शेतकऱ्यांसाठी महागडी अवजारे खरेदी करणे शक्य होत नाही. त्यासाठी औजारे बँकेची स्थापना प्रत्येक गावात करणे गरजेचे आहे. पॉवर विडरसारखे अवजार तणव्यवस्थापनासाठी उपयोगी आहे. अशा पध्दतीची शेती करीत असतांना आधुनिक पध्दतीचे तंत्रज्ञान जसे की क्रॉप कव्हर याचासुध्दा उपयोग होऊ शकतो. क्रॉपकव्हरचा वापर केल्यास कलिंगडासारख्या पिकावर सुरवातीच्या काळात रस शोषण करणाऱ्या किडींचा प्रादुर्भाव होत नाही आणि त्यामुळे विषाणुजन्य रोगांचा प्रसार थांबतो.

४. बरेचसे बुरशीजन्य रोग पाण्याचा अनियंत्रित वापरामुळे येतात. ठिबक सिंचनाने सुध्दा कधी कधी अनियंत्रीत पाणी दिले जाते. परिणामी मुळकुज, मर यासारख्या बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव वाढतो. जैविक बुरशीनाशक व किडनाशक एकत्रित वापरत असतांना त्यांच्यामधील द्रव्य माहित असणे आवश्यक आहे. काही जैविक बुरशीनाशके व जैविक किडनाशके एकत्रितरित्या काम करु शकत नाहीत. शेतामधील काडीकचरा व पिकांचे अवशेष कुजविण्यासाठी हि कंपोस्टींग कल्चर वापरणे व कंपोस्टींग करणे आवश्यक आहे. गांडुळखत तयार करतांना जनावरांचे ताजे शेण बेडवर टाकु नये. ताज्या शेणामध्ये मिथेन आणि कर्ब वायु असतो त्यामुळे गांडुळे मरु शकतात. जमीनीत जैविक बुरशीनाशक घालत असतांना सेंद्रीय पदार्थात योग्य पध्दतीने आंतरिपण करुन वापरणे गरजेचे आहे. बाजारपेठेत उतरण्यापुर्वी ब्रँडींग व पॅकिंचा विचार करावा व जास्त दर कसा मिळेल याचा विचार करणे आवश्यक आहे. सुरवातीच्या वर्षात एकरी उत्पादन कमी मिळेल, मात्र सदर मालास जास्त दर मिळाल्यास उत्पादनातील तफावत भरुन काढणे शक्य होईल. किड व्यवस्थापन करत असतांना सगळ्यात महत्वाचे म्हणजे किडीचे जिवनक्रम आपल्याला माहित असणे गरजेचे आहे. जेणेकरुन योग्यवेळी योग्य व्यवस्थापन पध्दतीचा जसे की, जैविक किडनाशक, मशागत पध्दतींचा वापर करुन किड व्यवस्थापन करणे सोपे होते.

५. **सातत्य, ब्रँडींग, पॅकिंग व जाहिरात:** सेंद्रिय अन्नपदार्थ वापरण्याकडे कमी प्रमाणात का असेना, लोकांचा कल वाढतो आहे. अशा पदार्थांना बाजारात वेगळी किंमत द्यायला ग्राहक तयार आहेत. आपण उत्पादक, व्यावसायिक आहोत. त्याचबरोबर आपण निसर्गाची किमया साकार करणारे कलाकार सुद्धा आहोत. बाजारपेठेत मागणीनुसार भाजीपाल्याचा पुरवठा सतत राखणे व सेंद्रीय भाजीपाला जादा दराने विकत घेणाऱ्या ग्राहकांचा शोध घेणे. ग्राहकांमध्ये सेंद्रिय उत्पादनाविषयी विश्वासार्हता वाढविण्यासाठी आपल्या शेतीचे प्रमाणीकरण करुन घेणे आवश्यक असते. प्रमाणिकरणाचा दुसरा फायदा म्हणजे आपल्या शेतमालाचा दर्जा, प्रत आपणास माहिती होते व अशा मालास सुरक्षिततेमुळे ग्राहक जास्त दर देण्यास तयार होतात. अशा मालास देशान्तर्गत मोठी बाजारपेठ सुद्धा प्रचंड मागणी आहे प्रमाणीकरणामुळे उत्पादीत मालाविषयी ग्राहकास कोणत्याही प्रकारची शंका अथवा गैरसमज उद्भवणार नाहीत आणि सेंद्रिय उत्पादीत मालाची विक्री चांगल्या प्रकारे होऊ शकेल.

**भूषण यादगिरवार**
विषय विशेषज्ञ,
कृषी विज्ञान केंद्र,
बोरगाव

